R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५९

दि.१२ फेब्रुवारी २०२६,वार: गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या भेटी घेत साधला संवाद





लातूर प्रतिनिधी: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. ११ फेब्रुवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला तसेच अडीअडचणी, समस्या जाणून घेऊन संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव त्यांनी सूचना देखील केल्या.

यावेळी लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन ॲड.समद पटेल, मनपा सदस्य-सतीश साळुंके, धोंडीराम उर्फ गोटू यादव, फिरदोस आरिफ शेख,भालचंद्र सोनकांबळे, व्यंकटेश पुरी, प्रा.सोमनाथ रोडे, माधव बावगे, डॉ. पन्हाळे, खाजा नसीरोद्दीन, पंकज शेळके, गोविंद देशमुख, प्रा.शिवाजी जवळगेकर, नारायण लोखंडे, सुरेश चव्हाण, प्रकाश राठोड, डॉ.गणपत राठोड, रियाज काजी, शबीर शेख, वसीम शेख, माधव गवळकर, नारायण कांबळे, प्रेमसागर पाटील,सचिन पाटील, बालाजी चौरे,युसूफ शेख, नरसिंग दरकसे, भागवत दरकसे, प्रा.संजय जगताप, जहीर साकोळकर, संतोष कांबळे आदिसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

आज लातूर जिल्हा परिषद व विविध पंचायत समित्यांच्या निवडणुकीत विजयी झालेले औसा, निलंगा, लातूर, उदगीर तालुक्यातील कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी बाभळगाव निवासस्थानी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट घेतली, यावेळी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी या निवडणुकीत घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे कौतुक करून आभार मानले आणि विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून नव्या जबाबदारीसाठी सर्वांना आमदार देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या,

## केवळ ४० टक्के निधी खर्च होणे ही गंभीर बाब; रखडलेल्या विकासकामांना तातडीने गती द्या!



लातूर:जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या निधीपैकी आतापर्यंत केवळ ४० टक्केच निधी खर्च झाला आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाने कामाचा वेग वाढवून उर्वरित निधीचा तातडीने विनियोग करावा. विकासकामात पारदर्शकता आणि दर्जा राखत, निधीअभावी रखडलेल्या योजनांना प्राधान्याने गती द्या, अशी आग्रही मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बुधवार दि. ११ फेब्रुवारी २६ रोजी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहिले यावेळी ते बोलत होते.

यावेळी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले तर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, खासदार ओमराजे निंबाळकर, तसेच माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, आमदार विक्रम काळे, आमदार रमेश कराड, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, नियोजन समितीतून मंजूर असलेल्या निधी पैकी आतापर्यंत फक्त ४० टक्केच निधी खर्च झाल्याची बाब गंभीर असून, कामाला गती देऊन उर्वरित निधीचा तातडीने विनियोग करावा. एकूण निधी वाटपात आणि योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवून दर्जेदार कामे करावीत. जिल्ह्यात निधीअभावी रखडलेल्या योजनांना निधीचा पुरवठा करून कामांना गती द्यावी.

बैठकीत पूढे बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले, लातूर येथे उभारावयाचे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व ८० फुट उंचीच्या पुतळ्यासाठी निधीची उपलब्धता करून द्यावी. तसेच लोकसभेचे माजी सभापती, माजी केंद्रीय गृहमंत्री आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या स्मारकासाठी निधीची, उपलब्धता करून द्यावी, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब तसेच माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मारकासही मंजुरी देण्यात यावी. माजी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांनी लातूर येथे उभारावयाच्या माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मारकासंबंधी घोषणा केली होती, त्या घोषणे प्रमाणे स्मारक उभारणीला निधी मंजूर करून गती द्यावी. अत्यंत गतीने विकसित होत असलेल्या लातूर शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी, नवीन बाह्यवळण रस्त्याला यापूर्वीच मंजुरी दिलेली असून, या रस्त्यासाठी ८० टक्के जमिनीचे संपादन झाले आहे. उर्वरित २० टक्के जमीन संपादनासाठी या महिन्यात होणाऱ्या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर रेल्वेस्टेशन आणि विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने जमीन संपादनासाठीही या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून द्यावा. अतिवृष्टीमुळे लातूर जिल्ह्यातील अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे त्यामुळे या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकात्मिक कार्यक्रमाची आखणी करून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. जिल्ह्यातील अनेक विकास योजना तसेच जलजीवन मिशनच्या योजना निधीअभावी रखडल्या आहेत, या कामांसाठी त्वरित निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीला गती द्यावी. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प व बॅरेजेस यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. बारामती येथे झालेल्या विमान अपघाताचे गांभीर्य लक्षात घेता लातूर विमानतळही एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाकडे हस्तांतरित करावे. या प्रमुख मागण्यांसह इतर विविध प्रकल्प तसेच शासकीय योजनांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था टिकून ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आदी मागण्यांची निवेदनेही लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना आमदार देशमुख यांनी दिली आहेत. प्रारंभी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, माजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या निधनाबद्दल त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्प अर्पण करून दोन मिनिटे स्तब्ध राहून सर्वांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## भूकंपविषयक आपत्ती व्यवस्थापनाची १७ फेब्रुवारी रोजी रंगीत तालीम

लातूर (जिमाका) : भूकंपासारख्या आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी

करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी

सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक व जिल्हा आपत्ती

व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून

जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी,

महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन

जिल्हा आपत्ती प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.

भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीत कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, काय

करावे व काय करू नये, याबाबतची माहिती एनडीआरएफ पथकामार्फत यावेळी दिली

जाणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व शासकीय

यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शोध व बचाव

पथके यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनातील महत्वाच्या

बाबींची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

## लातूर विमानतळावर सुरक्षा विषयक उपाययोजनांना प्राधान्य द्या-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले




लातूर, : येथील विमानतळावर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसह सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वमानतळाला संयुक्त भेट देवून पाहणी करावी. त्यानुसार कालबद्ध उपाययोजनांचा कृती

आराखडा तयार करण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विमानतळविषयक बैठकीत ते बोलत होते.

आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर विमानतळाचे व्यवस्थापक राजेश जीवन यांच्यासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यावेळी उपस्थित होतेतसे. तसेच महाराष्ट्र

विमानतळ विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता राजकुमार बॅरी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते.

विमानतळाच्या सुरक्षा भिंतीच्या बांधकामाला लवकरात लवकर सुरुवात करावी. येथील पांदन रस्त्याऐवजी शेतकऱ्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध करून द्यावा. सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक बाबी लक्षात घेवून आवश्यक कार्यवाही करावी. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून याबाबत माहिती द्यावी. शेतकऱ्यांची गैरसोय होवू नये, याची काळजी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले.

महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. बॅरी यांनी विमानतळावर प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली. तसेच लवकरच लातूर विमानतळाची संयुक्त पाहणी करण्यात येईल, असे सांगितले.

## मुख्यमंत्र्यांकडून नागपूर विभागाच्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा



नागपूर, : मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांकरिता वर्ष २०२६-२७ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचे प्रारुप आराखडे अंतिम करण्यासाठी दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेतली. शासनाने ठरवून दिलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा अतिरीक्त निधीची मागणी या बैठकीत जिल्ह्यांकडून करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे आयोजित या बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, शिक्षण राज्य मंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्यमंत्र्याच्या अतिरीक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे आणि प्रधान सचिव शिखर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता आदी उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त कार्यालयातून विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, नियोजन उपायुक्त अनिल गोतमारे उपस्थित होते.

या बैठकीत दूरदृष्य प्रणालीद्वारे नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना आणि प्रारुप आरखडयाबाबत सादरीकरण केले. जिल्ह्यांमधील विविध विकास कामांसाठी वित्तीय मर्यादेपेक्षा अतिरिक्त निधीची मागणी या जिल्ह्यांकडून करण्यात आली. आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे तर आमदार सुमित वानखेडे यांनी प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहून मागण्या मांडल्या.

## जेफरी एफस्टीन प्रकरण : सत्तेच्या सावल्या आणि न्यायव्यवस्थेची कसोटी

जागतिक पातळीवर जेफरी एफस्टीन प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या गुन्हेगारी वर्तनाचे उदाहरण नाही; ते आधुनिक लोकशाही व्यवस्थेतील सत्तेचे केंद्रीकरण, पैशाचे प्राबल्य, सामाजिक प्रतिष्ठेचा गैरवापर आणि न्यायव्यवस्थेतील उणिवांचे धक्कादायक चित्र उभे करते. एका वित्तीय सल्लागाराच्या रूपात उदयास आलेल्या एफस्टीनने अत्यंत प्रभावशाली लोकांशी संबंध प्रस्थापित केलेराजकीय नेते, उद्योगपती, शास्त्रज्ञ, शैक्षणिक संस्थांचे मान्यवर आणि सेलिब्रिटी. या संबंधांच्या जाळ्यामुळेच त्याच्याविरुद्धच्या गंभीर आरोपांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष झाले का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

आरोपांची भीषणता–एफस्टीनवर अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण आणि मानवी तस्करीचे आरोप होते. हे आरोप केवळ वैयक्तिक गुन्ह्यांपुरते मर्यादित नव्हते, तर एका संगठित जाळ्याची शक्यता व्यक्त करत होते. त्याच्या आलिशान निवासस्थानी आणि खाजगी बेटावर घडलेल्या घटनांविषयी अनेक साक्षी पुढे आल्या. पीडित मुलींच्या जबाबांमध्ये भीती, दबाव आणि पैशाच्या आमिषाचे संदर्भ होते. हे चित्र केवळ गुन्हेगारीचे नव्हे, तर सत्तेच्या संरक्षणाखाली वाढलेल्या विकृतीचे होते.

२००८ मधील वादग्रस्त करार–फ्लोरिडामध्ये २००८ साली झालेला 'प्लिया डील' हा या प्रकरणातील सर्वात मोठा वादाचा मुद्दा ठरला. गंभीर आरोप असूनही एफस्टीनला केवळ १३ महिन्यांची शिक्षा झाली आणि त्यातही विशेष सवलती देण्यात आल्या. त्याला दिवसातून अनेक तास जेलबाहेर कामासाठी जाण्याची मुभा होती. या करारामुळे अभियोजन यंत्रणा आणि न्यायप्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. सामान्य नागरिकाला अशी सवलत मिळाली असती का? हा प्रश्न आजही समाजाला अस्वस्थ करतो.

२०१९ ची अटक आणि संशयास्पद मृत्यू–२०१९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये एफस्टीनला पुन्हा अटक झाली. आरोप अधिक व्यापक आणि संघटित स्वरूपाचे होते. या वेळी जनमत अधिक सजग होते आणि माध्यमांनीही प्रकरण गांभीर्याने घेतले. मात्र अटकेनंतर काही आठवड्यांतच तुरुंगात त्याचा मृत्यू झाला. अधिकृतरीत्या आत्महत्या असे सांगण्यात आले, परंतु कारागृहातील सुरक्षेतील त्रुटी, सीसीटीव्ही बंद असणे, रक्षकांची अनुपस्थिती यामुळे संशय निर्माण झाला.

एफस्टीनच्या मृत्यूमुळे अनेक संभाव्य प्रश्न कायमचे अनुत्तरित राहिलेत्याच्या संपर्कात असलेले प्रभावशाली लोक कोण? त्यांची भूमिका काय? त्यांनी काय माहिती लपवली? या सर्व प्रश्नांवर पडदा पडल्याची भावना समाजात निर्माण झाली.

सहकारी आणि न्याय–एफस्टीनची निकट सहकारी घिसलेन मॅक्सवेल हिच्यावर खटला चालवण्यात आला आणि तिला शिक्षा झाली. हा न्यायप्रक्रियेचा एक टप्पा असला, तरी संपूर्ण जाळ्याचा उलगडा झाला का, याबद्दल शंका कायम आहेत. गुन्हेगारीचे स्वरूप इतके व्यापक असल्याचे संकेत मिळाले असताना केवळ काही व्यक्तींवरच कारवाई होणे पुरेसे ठरते का?

माध्यमांची भूमिका–या प्रकरणात स्वतंत्र पत्रकारितेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. काही माध्यमसंस्थांनी दीर्घकाळ तपास करून आणि पीडितांच्या साक्षी पुढे आणून प्रकरण पुन्हा प्रकाशझोतात आणले. जर पत्रकारांनी चिकाटी दाखवली नसती, तर कदाचित २००८ च्या करारानंतर हे प्रकरण कायमचे दडपले गेले असते. त्यामुळे मुक्त आणि निर्भय माध्यमे ही लोकशाहीची खरी प्रहरी आहेत, हे पुन्हा अधोरेखित झाले.

सत्तेचा प्रभाव आणि नैतिक जबाबदारी

एफस्टीनच्या संपर्कात असलेल्या अनेक प्रतिष्ठित व्यक्तींवर थेट गुन्हे सिद्ध झाले नसले, तरी नैतिक जबाबदारीचा प्रश्न उभा राहतो. एखाद्या व्यक्तीवर गंभीर आरोप असताना त्याच्याशी संबंध ठेवणे, त्याच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे किंवा आर्थिक व्यवहार करणेया कृतींमुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी स्वतःचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.

लोकशाही केवळ कायद्याने नव्हे, तर नैतिक मूल्यांनी टिकते. जर समाजातील उच्चभ्रू वर्ग स्वतःसाठी वेगळे नियम बनवत असेल, तर सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढळतो.

पीडितांचा आवाज–या सर्व गदारोळात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पीडितांचा न्याय. अनेक मुलींनी पुढे येऊन आपली वेदना मांडली. त्यांच्यासाठी ही केवळ न्यायालयीन लढाई नव्हती, तर सामाजिक कलंक, मानसिक आघात आणि भीतीशी सामना होता. त्यांचा आवाज ऐकला जाणे आणि त्यांना योग्य भरपाई व सन्मान मिळणे ही समाजाची जबाबदारी आहे.

व्यवस्थेतील सुधारणा आवश्यक–एफस्टीन प्रकरणाने काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत:प्रभावशाली आरोपींना विशेष सवलती का मिळतात?अभियोजन यंत्रणेतील पारदर्शकता किती आहे?कारागृह व्यवस्थेतील त्रुटी कशा दूर करायच्या?मानवी तस्करीविरोधी कायद्यांची अंमलबजावणी अधिक कठोर कशी करायची?या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय अशी प्रकरणे पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री देता येणार नाही.

लोकशाहीसाठी धडा–एफस्टीनची कहाणी ही एका व्यक्तीच्या पतनाची कथा नसून, सत्तेच्या अतिरेकाची चेतावणी आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि राजकीय संबंध यांच्या जोरावर कायद्याला वाकवता येते, अशी भावना जर समाजात पसरली, तर लोकशाहीची मुळे कमकुवत होतात.

न्यायव्यवस्था सर्वांसाठी समान आहे, हा लोकशाहीचा मूलमंत्र आहे. तो केवळ तत्त्वज्ञानात नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत दिसला पाहिजे. अन्यथा, न्याय केवळ दुर्बलांसाठी आणि सवलती केवळ सत्ताधाऱ्यांसाठीअशी दुहेरी व्यवस्था निर्माण होईल.

निष्कर्ष–जेफरी एफस्टीन प्रकरण आजही पूर्णपणे संपलेले नाही; ते एक प्रतीक बनले आहेव्यवस्थेतील अंधाऱ्या कोपऱ्यांचे. या प्रकरणातून धडा घेत, अधिक पारदर्शक, जबाबदार आणि संवेदनशील न्यायप्रक्रिया उभी करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाहीचा खरा कस हा अशा कठीण प्रसंगी लागतो. सत्ता आणि पैशाच्या सावलीत दडलेल्या अन्यायाला उघड करून, पीडितांना न्याय देणेहीच खरी प्रगती ठरेल.

# क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे!

समाजात एखादी व्यक्ती, संस्था किंवा विचारधारा शांतपणे, न बोलता आपले काम करत असते तो पर्यंत ती फारशी कुणाच्या नजरेत येत नाही. पण ज्या क्षणी त्या कामाचा परिणाम दिसू लागतो, लोकांच्या जीवनात बदल घडू लागतो, प्रश्न विचारले जाऊ लागतात, तेव्हा त्या प्रभावाची पहिली किंमत द्यावी लागते बदनामीच्या स्वरूपात. कारण प्रभाव हा केवळ प्रगतीचा सूचक नसतो; तो विद्यमान सत्ताकेंद्रांना, सोयीस्कर व्यवस्थेला आणि जडलेल्या हितसंबंधांना दिलेला थेट आव्हान असतो. इतिहास साक्षी आहे, प्रभावी माणसाची बदनामी ही अपघात नसून नियोजनबद्ध प्रक्रिया असते, कारण प्रभाव म्हणजे अस्वस्थ करणारी जाणीव. प्रभावी व्यक्ती किंवा विचार समाजाला अस्वस्थ करतो. तो लोकांना प्रश्न विचारायला शिकवतो, स्वीकारलेली गुलामी नाकारायला भाग पाडतो, आणि हे असेच का? असा मूलभूत प्रश्न उभा करतो. ही अस्वस्थता अनेकांना नकोशी असते. कारण प्रश्न विचारणारा समाज म्हणजे हुकूमशाही, अन्याय आणि शोषणासाठी धोक्याची घंटा. म्हणूनच ज्या क्षणी तुमचा प्रभाव वाढू लागतो, त्या क्षणी तुमच्याविरोधात संशय निर्माण केला जातो, तुमच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते, आणि हळूहळू तुमची प्रतिमा मलिन करण्याचे उद्योग सुरू होतात.

आजच्या काळात बदनामी ही तलवारीसारखी समोरून चाल करून येत नाही; ती विषासारखी हळूहळू शरीरात भिनते. कुजबुज, अफवा, अर्धसत्य, अतिशयोक्ती, जुने संदर्भ तोडून मांडणे ही बदनामीची आधुनिक हत्यारे आहेत. सोशल मीडियाच्या युगात तर बदनामीला वेग आणि व्याप्ती दोन्ही मिळाले आहेत. एका क्लिकवर तुमच्यावर आरोप, एका पोस्टवर तुमचा चारित्र्यहनन, आणि एका व्हिडिओत तुमच्या संपूर्ण कार्याचा अपलाप. सत्य तपासण्याची तसदी न घेता लोक निर्णय देतात. कारण सत्य शोधणे मेहनतीचे काम आहे, तर बदनामी स्वीकारणे सोपे. नेमकी प्रभावी माणसेच लक्ष्य कां होतात? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समाजात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात, अनेक भ्रष्ट, अपयशी, अनैतिक लोक वावरत असतात, पण त्यांच्यावर फारशी टीका होत नाही. मग बोट का रोखले जाते ते नेहमी काम करणाऱ्यांवरच? कारण निष्क्रिय माणूस कुणाचाच शत्रू नसतो. तो व्यवस्थेला धोका नसतो. पण प्रभावी व्यक्ती ही व्यवस्थेच्या कमतरतांचा आरसा दाखवते. ती सांगते हे शक्य आहे, बदल होऊ शकतो. आणि ही शक्यता अनेकांच्या स्वार्थाला घातक ठरते. म्हणूनच बदनामीचा हेतू एकच असतो, विश्वास तोडणे. लोकांचा विश्वास ढळला, की प्रभाव आपोआप कमी होतो. काम कितीही चांगले असले, तरी संशयाची सावली पडली की समाज मागे सरकतो. इतिहासातील प्रत्येक परिवर्तनाची हीच कथा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, महात्मा गांधी असोत, महात्मा फुले असोत किंवा आधुनिक काळातील कोणताही समाज परिवर्तनवादी, प्रत्येकाच्या वाट्याला बदनामी आलीच. कुणाला देशद्रोही ठरवले गेले, कुणाला धर्मविरोधी, कुणाला समाजविघातक, तर कुणाला सत्तालोलुप.

परंतु इतिहासाने एक गोष्ट स्पष्ट केली, बदनामी क्षणिक असते, प्रभाव टिकून राहतो. कारण बदनामी शब्दांवर उभी असते, तर प्रभाव कृतींवर. बदनामी ही अपयशाची कबुली असते. जेव्हा तुमच्या विचारांना तर्काने, तुमच्या कामाला पर्यायाने, आणि तुमच्या प्रश्नांना उत्तराने पराभूत करता येत नाही, तेव्हा शेवटचा उपाय म्हणजे व्यक्तीवर हल्ला. हा हल्ला म्हणजेच बदनामी. म्हणजेच बदनामी ही प्रत्यक्षात तुमच्या अपयशाची नाही, तर तुमच्या विरोधकांच्या अपयशाची कबुली असते. त्यांना तुमच्याशी वैचारिक लढाई जिंकता आली नाही, म्हणून त्यांनी चारित्र्यहननाचा मार्ग स्वीकारला. इथेच प्रभावी माणसाची कसोटी लागते. बदनामीला घाबरून तो माघार घेतो का? की सत्याच्या मार्गावर ठाम राहतो? अनेकजण इथेच थकतात. कारण बदनामी वेदनादायी असते. ती केवळ प्रतिमेवर नाही, तर मनावर, नात्यांवर आणि आत्मविश्वासावर आघात करते. पण जो माणूस स्वतःच्या हेतूंवर प्रामाणिक असतो, त्याला एक गोष्ट माहीत असते आज नाही, उद्या नाही, पण एक दिवस सत्य उघड होणारच. फक्त प्रभावी व्यक्तींनीच नाही, तर समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण अफवांवर विश्वास ठेवतो का? अर्धसत्य स्वीकारतो का? की प्रश्न विचारतो? कारण बदनामी फोफावते ती प्रेक्षकांच्या मौनामुळे. जर समाज सजग झाला, विवेक वापरू लागला, तर बदनामीचे उद्योग आपोआप निष्प्रभ ठरतील. अन्यथा प्रत्येक नव्या विचाराचा गळा दाबला जाईल आणि समाज स्थैर्याच्या नावाखाली कुजत राहील.

म्हणूनच एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे. ती भीतीदायक वाटू शकते, त्रासदायक असू शकते, पण ती तुमच्या अपयशाची खूण नाही; ती तुमच्या यशाची चाहूल आहे. इतिहास कधीही बदनामी करणाऱ्यांच्या नावाने ओळखला जात नाही; तो नेहमी प्रभाव टाकणाऱ्यांच्या नावाने लिहिला जातो. म्हणूनच बदनामीच्या गदारोळातही जेव्हा तुम्ही शांतपणे, ठामपणे आणि प्रामाणिकपणे काम करत राहता, तेव्हाच खरा परिवर्तनाचा अध्याय सुरू होतो. कारण शेवटी एकच सत्य उरते, बदनामीची वादळे थांबतात, पण प्रभावाची दिशा इतिहास ठरवतो.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण?

फेब्रुवारीचा महिना आला की हवेत एक वेगळीच ऊब पसरते. गुलाबांची पाकळी, चॉकलेट्सची गोडी, शब्दात न मावणाऱ्या भावना आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं. या साऱ्यांचा एकत्रित उत्सव म्हणजे व्हॅलेंटाईन डे. काहींसाठी तो फक्त एक दिवस असतो पण अनेकांसाठी तो संपूर्ण आयुष्याची आठवण करून देणारा क्षण असतो. प्रेम म्हणजे केवळ गुलाब, कार्ड्स आणि सोशल मीडियावरचे स्टेटस नाही, तर तो माणसाच्या अस्तित्वाचा आत्मा आहे, जो श्वासासोबत आत जातो आणि नात्यांमधून बाहेर प्रकट होतो. प्रेम हे कोणत्याही एका दिवसापुरते मर्यादित नसते. तरीही व्हॅलेंटाईन डे चे महत्त्व नाकारता येत नाही. कारण हा दिवस आपल्याला थांबवतो धावपळीच्या, स्वार्थी, स्पर्धात्मक जगात थोडा वेळ स्वतःकडे आणि आपल्या माणसांकडे पाहायला भाग पाडतो. आपण प्रेम करतो का? यापेक्षा आपण प्रेम व्यक्त करतो का? हा प्रश्न या दिवशी अधिक ठळक होतो.



आजच्या काळात प्रेमालाही बाजारपेठेचा रंग चढला आहे. गिफ्ट्सची किंमत, रेस्टॉरंट्सचे पॅकेजेस, सोशल मीडियावरील 'परफेक्ट कपल' फोटो या सगळ्यात प्रेम हरवत चालले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण प्रेम कधीच वस्तू नव्हते आणि कधीच होणार नाही. प्रेम म्हणजे दोन माणसांमधील न दिसणारा करार एकमेकांना समजून घेण्याचा, स्वीकारण्याचा आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देण्याचा. भारतीय संस्कृतीत प्रेमाला नेहमीच गहिरे, शांत, संयमी रूप दिले गेले आहे. सावित्रीचे सत्यवानावरील प्रेम, राधा–कृष्णाची अध्यात्मिक जवळीक, मीरा आणि विठ्ठलाचे भक्तिपूर्ण नाते ही प्रेमाचीच विविध रूपे आहेत. आज मात्र प्रेमाला फक्त रोमँटिक चौकटीत अडकवले जाते. प्रत्यक्षात प्रेम हे आईच्या काळजीत असते, वडिलांच्या न बोलणाऱ्या त्यागात असते, मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असते आणि वृद्धांच्या डोळ्यातल्या शांततेत असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेमाचा हा व्यापक अर्थ पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे. प्रेम म्हणजे केवळ 'तू माझा किंवा माझी' एवढेच नव्हे, तर 'मी तुझ्यासाठी आहे' हे नि:स्वार्थी भावनेतून उमटलेले वाक्य आहे. प्रेमात अधिकार असतो, पण मालकी नसते. प्रेमात अपेक्षा असतात, पण अटी नसतात. प्रेमात राग असतो, पण तोही जपणुकीचा असतो. आजच्या तरुणाईवर अनेकदा प्रेमाबाबत आरोप केले जातात की ते उथळ आहे, क्षणिक आहे, दिखाऊ आहे. पण सत्य असे आहे की आजची पिढी प्रेम व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहे. त्यांच्या भाषेत प्रेम आहे, त्यांच्या संगीतामध्ये प्रेम आहे, त्यांच्या कविता आणि मेसेजेस मध्ये प्रेम आहे. दोष प्रेमाचा नाही, तर प्रेम समजून न घेणाऱ्या समाजाचा आहे. प्रेमाला विरोध करणारे अनेक आवाज आजही समाजात आहेत.

व्हॅलेंटाईन डे म्हणजे 'पाश्चात्त्य संस्कृती' असा शिक्का मारून प्रेम व्यक्त करणाऱ्यांना दोषी ठरवले जाते. पण प्रेमाला संस्कृती नसते; प्रेम ही माणसाची मूलभूत गरज आहे. संस्कृती जर प्रेमाला नाकारत असेल, तर त्या संस्कृतीला पुन्हा तपासण्याची गरज आहे. प्रेम हे बंडखोर असते ते जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती या सगळ्या भिंती ओलांडते. म्हणूनच कदाचित प्रेमाला नेहमीच विरोध झाला आहे. कारण प्रेम प्रश्न विचारते, रूढी मोडते आणि माणसाला माणूस म्हणून उभे करते. व्हॅलेंटाईन डे हा त्या बंडखोरीचा शांत, सुंदर उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात नात्यांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. मोबाईलमध्ये हजारो संपर्क असले तरी मनात जवळीक कमी होत आहे.

अशा वेळी व्हॅलेंटाईन डे आपल्याला आठवण करून देतो की, प्रेमासाठी वेळ काढावा लागतो, संवाद साधावा लागतो, आणि कधी कधी स्वतःला बाजूला ठेवावे लागते. खरे प्रेम मोठ्या शब्दांत व्यक्त होत नाही; ते छोट्या कृतींमध्ये दिसते. थकलेल्या जोडीदारासाठी केलेला चहा, मित्राच्या अपयशात दिलेली शांत साथ, आई–वडिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारी एक साधी भेट, हेच प्रेमाचे खरे क्षण आहेत. व्हॅलेंटाईन डे हा अशा क्षणांची उजळणी करण्याचा दिवस आहे. आज प्रेमालाच टिकून राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो. नाती तुटतात, विश्वास ढासळतो, आणि लोक एकमेकांपासून दूर जातात. पण तरीही प्रेम संपत नाही. कारण प्रेम हे शेवटी आशेवर उभे असते उद्या सगळं बरं होईल या विश्वासावर. व्हॅलेंटाईन डे हा त्या आशेचा उत्सव आहे. प्रेम हे परिपूर्ण नसते. त्यात चुका असतात, मतभेद असतात, वेदना असतात. पण तरीही प्रेम सोडून देण्यापेक्षा त्याला समजून घेणे महत्त्वाचे असते. प्रेम म्हणजे प्रत्येक वेळी जिंकणे नाही, तर कधी कधी हरूनही एकत्र राहणे असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने समाजाने एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, प्रेमाला स्वीकारले तरच माणुसकी टिकेल. द्वेष, हिंसा, असहिष्णुता यांच्यावर मात करण्याची ताकद फक्त प्रेमात आहे. प्रेमाशिवाय कोणतीही क्रांती टिकू शकत नाही, कोणतीही संस्कृती फुलू शकत नाही. आज गरज आहे ती प्रेमाला मोकळा श्वास घेऊ देण्याची. प्रेम करणाऱ्यांना प्रश्न विचारण्याऐवजी त्यांना समजून घेण्याची. कारण प्रेम दडपले गेले की ते वेदनेत बदलते, आणि स्वीकारले गेले की ते जीवनात बदल घडवते. व्हॅलेंटाईन डे म्हणजे फक्त प्रेमींचा दिवस नाही; तो माणसाचा दिवस आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक नात्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, प्रेम व्यक्त करण्याचा आणि थोडे अधिक माणूस होण्याचा दिवस आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, प्रेम नेहमी जवळ असतेच असे नाही. कधी ते अंतरात असते, कधी आठवणीत, कधी न बोललेल्या शब्दांत. विरह म्हणजे प्रेमाचा अभाव नसतो; तो तर प्रेमाचीच सर्वात प्रामाणिक परीक्षा असते. ज्याची ओढ लागते, ज्याची आठवण मनाला थकवते आणि तरी ही ज्याच्यासाठी मन प्रार्थना करत राहते, तेच खरे प्रेम. काही प्रेमकथा हातात हात घालून पूर्ण होतात, तर काही डोळ्यांत पाणी ठेवून अपूर्णच राहतात. पण अपूर्णतेतही जे जिवंत राहते, जे काळाच्या ओघातही मनात सलत राहते, तेच प्रेम अमर असते. कारण प्रेम मिळण्यात नसते; ते थांबण्यात, वाट पाहण्यात आणि आठवणी जपण्यात असते. व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबामागे कधी कधी एक न बोललेली हुरहूर असते, चॉकलेटच्या गोडीमागे एखादी न व्यक्त झालेली वेदना असते. तरीही माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो, कारण विरहही सांगून जातो की, आपण कुणावर तरी मनापासून प्रेम केले होते.

प्रेम जवळ असो वा दूर, समोर असो वा आठवणीत ते जर खरं असेल तर ते मनाला अधिक माणूस बनवतं आणि म्हणूनच, प्रेम हरवले तरी त्याची आठवण जपा; कारण काही नाती आयुष्यात साथ देत नाहीत, पण आयुष्यभर अर्थ देऊन जातात. प्रेमाला एक दिवस पुरेसा नसतो, पण एक दिवसही निरर्थक नाही. कारण कधी कधी एक दिवसच आयुष्यभराची दिशा ठरवतो. प्रेम करा, व्यक्त करा आणि जपा, कारण प्रेम हेच खरं शाश्वत सत्य आहे. तुमचं आयुष्य प्रेमाने, आपुलकीने आणि सुंदर नात्यांनी नेहमी फुलत राहो, भावनांना शब्द मिळोत आणि शब्दांना अर्थ. व्हॅलेंटाईन डे च्या मनापासून शुभेच्छा!

**प्रेम करा**
**जुळले नाही तरी चालेल,**
**भेट झाली नाही तरी चालेल**
**पण मनातलं प्रेम खोटं ठरू देऊ नका.**
**कारण विरहातही जे उजळतं,**
**तेच खरं, शाश्वत प्रेम असतं.**

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# लातूरच्या १००१ महाविद्यालयीन युवक युवतींना मोफत हेल्मेट वितरण

लातूर : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील १००१ महाविद्यालयीन युवक युवतींना मोफत हेल्मेट वितरण करून लातूर शिवसेनेने एक अनोखा सामाजिक उपक्रम राबविला. शिवसेना निरीक्षक धीरज देशमुख आणि जुगलकिशोर तोष्णीवाल यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम यशस्वी करण्यात आला.

दयानंद महाविद्यालय सभागृहात संपन्न झालेल्या या उपक्रमात शहरातील महाविद्यालयीन युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर सुरेश पवार तर प्रादेशिक परिवहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे, शिवप्रसाद तोष्णीवाल, रवी चव्हाण, संदीप पाटील, श्रीकांत रांजणकर



यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार संतोष बांगर यांनी दूरध्वनीवर उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि या लोकाभिमुख उपक्रमासाठी आयोजकांचे कौतुक देखील केले.

मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून हेल्मेट हे आपले जीवरक्षक आयुध आहे. प्रत्येक नागरिकाने वाहन चालविताना याचा वापर करण्याचे आवाहन केले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यावेळी सामूहिक रस्ता सुरक्षा विषयक शपथ घेतली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कुलदीप सूर्यवंशी, बालाजी घोडसे, निलेश मांदळे, प्रीती कोळी, अर्चना बिराजदार, उत्तम लोंढे, विश्वास कुलकर्णी, मनोज जोशी, जाकीर सय्यद, प्रितेश भंडारी यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

# नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचा भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार

लातूर – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भातांगळी जिल्हा परिषद गटातून महादेव साळुंके, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, भादा गटातून सौ. छायाबाई पद्माकर चिंचोलकर तसेच भातांगळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता राजकिरण साठे आणि बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांनी विजय मिळविला.

भाजपा लातूर मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात अल्या. प्रारंभी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील आणि सुरज शिंदे यांनी सत्कार केला.

याप्रसंगी भातांगळी जिप गटातील महादेव साळुंके, खरोळा जिप गटातील महेंद्र गोडभरले, भादा जिप गटातील पद्माकर चिंचोलकर आणि भातागळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता यांच्या वतीने राजकारण साठे यांनी तर बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांच्या वतीने बंधू हनुमंत गव्हाणे यांनी सत्कार स्वीकारला.

याप्रसंगी भाजपाचे साहेबराव मुळे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, किरण मुंडे, ॲड. सतीश बिराजदार, सोमनाथ पावले, गोविंद मुंडे, ओम चव्हाण, बालाजी गवळी, सुभाष राठोड, महादेव मुळे, रमेश पाटील, श्रीराम साळुंके यांच्यासह अनेकजण होते.

# गांधी पर्याय नसून शाश्वत उपचार : किशोर बेळेकर

लातूर : पैशाच्या आधारे चालणाऱ्या जगात मानवी मूल्यांची होत चाललेली झीज अधोरेखित करणारा प्रभावी मूक व्यंगचित्रपट 'गांधी टॉक्स' हा केवळ महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता, आजच्या समाजात 'गांधी' या नावाचा नेमका अर्थ काय आहे, असा विचार मांडतो, असे दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेळेकर यांनी लातूर येथे माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.



अभिजात फिल्म सोसायटी, लातूर यांच्या वतीने 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करताना बेळेकर म्हणाले की 'गांधी' हा शब्द दोन भिन्न अर्थांनी वापरला जातोएक म्हणजे सत्य आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक, तर दुसरा आधुनिक जीवनातील पैसा आणि सत्तेच्या वर्चस्वाचे रूपक. मूकता, प्रतीकात्मकता आणि दृश्यप्रधान कथनशैलीच्या माध्यमातून भौतिकतावादाने मानवी भावना व मूल्ये कशी झाकोळली आहेत, हे या चित्रपटात प्रभावी सामाजिक व्यंगातून मांडले आहे, भारतात पहिला चित्रपट जो बनवला गेला राजा हरिश्चंद्र तो एक मूकपट होता आणि तो एका मराठी माणसाने अर्थात दादासाहेब फाळकेंनी बनवला आणि तेव्हापासून चित्रपट निर्मितीची सुरुवात झाली, या गोष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली, १०० वर्षांनंतर ही गोष्ट अभिमानाने साजरी करताना बनवण्यात येणारा चित्रपटही मूकपट असावा आणि ही भावना मनात ठेऊन हा चित्रपट विना संवादच असावा अस मी ठरवलं आणि मी त्यावर काम केल, योगायोगाने मी पण मराठीच आहे.

'पुष्पक' नंतर जवळपास ४० वर्षांनंतर प्रदर्शित झालेला हा मूक चित्रपट असून, त्याच्या संकल्पना आणि कथेसाठी जवळपास २५ वर्षे परिश्रम घेतल्याचे बेळेकर यांनी सांगितले. संवादांशिवाय केवळ दृश्यरचना, पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाच्या आधारे भावना, संघर्ष आणि विचार व्यक्त करणे हे मोठे सर्जनशील आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, मूक चित्रपटाला भावनिक आवाज देण्याचे श्रेय त्यांनी रहमान यांना दिले. मूक चित्रपटात संगीतच संवादाचे काम करते. ते प्रेक्षकांना कथानकातून मार्गदर्शन करते आणि प्रत्येक भावनेला अधिक प्रभावी बनवते, असे ते म्हणाले.

सध्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असलेला 'गांधी टॉक्स' लवकरच मराठी आवृत्तीतही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनुभवी कलाकारांच्या प्रभावी अभिनयावर आधारित हा चित्रपट चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि पडद्यावरील उपस्थितीच्या माध्यमातून कथा सांगत प्रेक्षकांना अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करतो, या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपती, अरविंद स्वामी, बॉलिवूड अभिनेत्री आदिती राव हैदरी, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रियदर्शनी इंदलकर, वनिता खरात आदी दिग्गज कलाकारांच्या भूमिका असून हा चित्रपट मराठीसह ५ भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, अभिनेते सचिन दानाई, डॉ. स्वप्नील देशमुख, आदित्य कुलकर्णी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, प्रा.डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ दुर्गा शर्मा, शिवशंकर पटवारी यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# देवस्थान समिती व शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून यात्रा महोत्सव यशस्वी करावा : अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके

लातूर/प्रतिनिधी : लातूरचे ग्रमदैवत स्थापन करून त्या ठिकाणी ध्वनीनिक्षेपक




असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यावर्षी १५ फेब्रुवारी ते २ मार्च या दरम्यान महाशिवरात्री यात्रा महोत्सव पार पडत आहे. या यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरची गौरवशाली परंपरा अधिकाधिक उज्ज्वल करत यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी देवस्थान समितीच्या सहकार्यातून सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे, अशी सूचना अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांनी दिली आहे.

लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवाची पूर्व तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठक अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, अशोक भोसले, नरेश पंड्या, रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने आयोजित होत असलेली महाशिवरात्री यात्रा महोत्सव हे लातूरचे वैभव आहे. या यात्रेची महती लातूर जिल्ह्यासह परजिल्ह्यात व इतर राज्यातही पोहोचली आहे. यामुळे या यात्रा महोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक व नागरिकांची मोठी गर्दी होते. ही गर्दी लक्षात घेवून प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ते नियोजन करावे, असे सांगून अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके म्हणाले की, वाहतूक, पार्कींग व सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून शहर महानगरपालिका व पोलिस प्रशासनाने तात्काळ आवश्यक त्या उपाय योजना सुरु कराव्यात असे सांगितले. मंदीर परिसरात स्वतंत्र पोलिस कक्ष स्थापन करून त्या ठिकाणी ध्वनीनिक्षेपक व धोक्याची सूचना देणारी यंत्रणा सज्ज करावी. गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी रांग व्यवस्था योग्य प्रकारे करून या ठिकाणी देवस्थानच्या वतीने स्वयंसेवक नेमावे अशी सूचना करण्यात आली.

महापालिका प्रशासनाने मंदीराकडे जाणाजया सर्व प्रमुख मार्गाची तत्काळ दुरुस्ती करून सुरक्षेच्या दृष्टीने पथदिवे तातडीने सुरु करावेत, अशी सूचना करून यात्रा महोत्सव परिसरात आरोग्य यंत्रणा व रुग्णवाहिका सज्ज ठेवावी, असे केशव नेटके यांनी सांगितले. यात्रा महोत्सवादरम्यान परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी मनपा प्रशासनाने विशेष लक्ष देवून याठिकाणी स्वच्छता पथक तैंनात करण्याची सूचनाही देण्यात आली. यात्रा महोत्सवात जे खाद्य पदार्थाचे स्टॉल उभारले जातात त्या ठिकाणी कोणतीही भेसळ होणार नाही याची दक्षता घेवून तेथील खाद्य पदार्थाचे नमुने वेळोवेळी घेवून अन्न औषध प्रशासनाने त्याची तपासणी करावे, असेही सूचना करण्यात आले. कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात येणाजया प्रदर्शाची अधिकाधिक प्रसिध्दी करून या माध्यमातून शेतकजयांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी काही अडचणी मांडल्या. त्या अडचणी सोडविण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्यात यावे, असे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी नेटके यानी दिले. यावेळी देवस्थानच्या वतीने यात्रेच्या पहिल्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते होणारे ध्वजारोहन व महाभिषेक यासाठी निमंत्रित करण्यातआले आहे. यावेळी पोलिस, आरोग्य, महानगरपालिका, जिल्हा परीषद, बांधकाम विभाग, महावितरण, अन्न व औषध प्रशासन आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# महारेशीम अभियान २०२६' अंतर्गत रेशीम रथाला पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे.भोसले यांनी दाखविली हिरवी झेंडी

लातूर, (जिमाका) : रेशीम




शेतीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १० फेब्रुवारी २०२६ ते ११ मार्च २०२६ याफ कालावधीत 'महारेशीम अभियान २०२६' अभियान राबविण्यात येत आहे. यानिमित्त रेशीम शेतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी जिल्हा रेशीम ार्यालयाने तयार केलेल्या रेशीम रथाला आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी हिरवी
झेंडी दाखविली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह रेशीम उत्पादक शेतकरी यावेळी उपस्थित होते.

रेशीम शेतीचे फायदे व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची माहिती देण्यासाठी रेशीम रथ गावा–गावांमध्ये जाणार आहे. महारेशीम अभियान अंतर्गत जिल्ह्यात रेशीम शेतीच्या प्रसारासाठी, माहिती देण्याबरोबरच नवीन रेशीम लागवडसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर व जीवनमान उंचावण्यास रेशीम शेतीमुळे मदत होणार आहे, असे जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी सांगितले.

# पोलीस अधीक्षक साहेबआमचे गाव आपल्या पोलीस यंत्रणेमुळे होतेय बदनाम-संजय शिंदे

नेकनूर/प्रतिनिधी-नेकनूर येथे स्वातंत्र्या काळापासून पासून पोलिस स्टेशन आहे. परंतु स्वातंत्र्य काळापासून आजपर्यंत आमच्या गावाची एवढी बदनामी झाली नसेल तेवढी मागील वर्षभरापासून पोलीस प्रशासनामुळे आमच्या नेकनूर गावची नाहक बदनामी होत आहे तरी पोलीस अधीक्षक साहेब यांनी सदर प्रकरणी तात्काळ लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे संजय शिंदे यांनी मागणी केली आहे.



सध्या नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात चोरी, मारामाऱ्या, अवैध धंद्यात वाढ झालेली आहे. गुन्हेगार शोधणे, चोर पकडणे, शांतता राखण हे पोलीस कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असताना ते सोडून चक्क फिर्यादीला धमकावणे, त्यांच्या नातेवाईकांना मारहान करण्याचे प्रकार पोलिस करत आहेत. त्याबाबतच्या अनेक दैनिक व चॅनल सह विविध सोशल मीडिया माध्यमांद्वारे बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यामध्ये मुख्यत्व नेकनूर येथील पोलिस स्टेशन असाच उल्लेख असतो. म्हणजे कायदा सुव्यवस्था पायदळी तुडवून आमच्या गावची बदनामी करण्याचे काम हे पोलीस यंत्रणाच करत आहेत. मागील तीन चार महिन्यापूर्वी चौसाळा येथे झोडगे नामक लोकसेवा आयोगाची परीक्षा देणाऱ्या एका विद्यार्थ्यांचे करिअर बरबाद करण्याच्या धमक्या दिल्या होत्या. तो व्हिडीओ महाराष्ट्रभर चर्चेत आला होता. तसाच प्रकार दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी घडला असून चक्क फिर्यादी यांना धमकावले आणि त्यांच्या सोबत आलेल्या नातेवाईक यांना मारहाण केली. मागील दोन महिन्यापासून मुलीच्या शोधासाठी पोलिस स्टेशन येथे चकरा मारत आहेत. पण त्यांना मदत केलीच नाही व त्यांचा तपास दोन महिन्यापासून न करताच त्यांना मारहाण करून हाकलून देत आहेत. सदर प्रकरणाची माहिती ही पत्रकार बांधवांना मिळाली असता पत्रकार बांधव पोलीस ठाणे येथे गेले त्यानंतर फिर्यादी व फिर्यादीचे नातेवाईक हे त्यांची व्यथा पत्रकार बांधवासमोर मांडत होते पत्रकार तेथे व्यतीत झालेल्या फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांचे पत्रकार हे चित्रीकरण करत होते व त्यांचे म्हणणं हे जाणून घेत होते. पत्रकार हे संबंधितांचे म्हणणे ऐकून त्यांचे चित्रीकरण करत असताना पत्रकारांच्या अंगावर कर्मचारी हे धावून गेल्याचे व्हिडिओ क्लिप मध्ये निदर्शनास येत आहे. यामुळे पोलिस यंत्रणा बदनाम आहेच पण आमच्या गावाला नाहक बदनाम करत आहेत. पोलीस कर्मचारी हे पत्रकार बांधवांना त्यांच्या हक्कापासून दूर ठेवून त्यांना दमदाटी करत होते. पोलीस अध्यक्ष साहेब तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना आवर घालावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.

# सुकळी-गोटेगाव रस्ता प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी अहवाल सादर करण्याचे उच्च न्यायालय खंडपीठाचे आदेश

केज/प्रतिनिधी□केज तालुक्यातील सुकळी-गोटेगाव येथून जात असलेला कळंब-आंबेजोगाई राज्य महामार्ग या महामार्गावर बांधण्यात आलेल्या नवीन रस्त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे भुसंपादन न करता रस्ता बांधण्यात आला आहे या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने याचिका कर्त्याच्या याचिकीची गंभीर दखल घेत जिल्हा अधिकारी बीड यांना सदरील प्रकरणी चौकशी करून त्या संबंधीचा अहवाल सादर करण्याचे उच्च न्यायालय खंडपीठाने आदेश जारी केला आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, कळंब-आंबेजोगाई राज्य महामार्ग हा केज तालुक्यातील सुकळी,गोटेगाव येथून जात आहे. या राज्य मार्गावरील सुकळी गोटेगाव दरम्यान बांधण्यात आलेल्या नवीन रस्त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन न करता सदरील रस्ता बांधण्यात आल्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने दाखल याचीकेची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी बीड यांना सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

केज तालुक्यातील सुकळी- गोटेगाव येथील मोहन रंगनाथ गायकवाड यांच्यासह इतर बाधित शेतकऱ्यांनी उच्च न्यायालय खंडपीठात याचीका दाखल केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. मांजरा धरणाच्या बॅक वॉटर मुळे जुना मूळ रस्ता हा पाण्याखाली गेल्यानंतर गोटेगाव गावातून पुलाची उंची वाढविण्यासाठी जवळपास तीन ते चार किलोमीटरचा नवीन रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत बांधण्यात आला आहे.

सदरील रस्ता हा तयार करत असताना कोणतीही कायदेशीर भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात आलेले नाही.

त्याचबरोबर बाधित शेतकऱ्यांना एक रुपयाचा ही मोबदला देण्यात आलेला नाही. असा आरोप याचिकाकर्त्यांनी केलेला आहे.

संबंधित बाधित शेतकऱ्यांनी मोबदला मागण्याची मागणी केल्यानंतर शासनाकडून २० (वीस) वर्षानंतर मावेजा मागता येत नाही. असे शेतकऱ्यांना सांगण्यात आले आहे. असे अमर गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

हक्क सोडले असतील किंवा पाटबंधारे विभागाने मोबदला दिला असेल अशी परस्पराविरोधी संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्तरे देण्यात आली. मात्र सदर प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान लातूर येथील पाटबंधारे विभागाने संबंधित रस्त्यासाठी कसल्याच प्रकारचे भूसंपादन केले नसल्याचे कळविले आहे.

सदर प्रकरणी कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठाने जिल्हा अधिकाऱ्यांना आदेश देताना सुकळी-गोटेगाव येथील नवीन रस्त्याची बांधणी करण्यासाठी कोणत्या जमिनीतून रस्ता जातो अथवा जमिनीचे मालक कोण आहेत. सदर रस्ता केव्हा आणि कोणी बांधला आहे. यासह आदी प्रश्न उपस्थित करून त्याबाबत सविस्तर चौकशी करून ३ (तीन) महिन्याच्या आत सदर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

यावेळी माध्यमांशी बोलताना अमर गायकवाड यांनी म्हटले की,आमच्या शेतातून राज्य रस्ता गेलेला आहे. परंतु शासनाने आमच्या जमिनीचे भूसंपादन केलेले नाही. व त्याचा मोबदला देखील आम्हाला शासनाने दिलेला नाही. आम्ही आम्हाला मावेजा मिळावा म्हणून शासन स्तरावर पाठपुरावा करत होतो. परंतु प्रशासनातील अधिकाऱ्यांनी करत आम्हाला वेळोवेळी चुकीचे उत्तरे दिलेली आहेत. म्हणून आम्ही उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणी शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. यापुढेही मा. जिल्हाअधिकारी बीड व माननीय उच्च न्यायालय आम्हा शेतकऱ्यांना न्याय देतील अशी गायकवाड यांनी अपेक्षा व्यक्त केली.

# लातूर जिल्हा पोलीस भरती २०२४-२५ : शारीरिक मोजमाप व चाचणी प्रक्रिया सुरु

लातूर :- लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ अंतर्गत शारीरिक मोजमाप व शारीरिक चाचणी प्रक्रियेला दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे सुरुवात झाली आहे.

भरती प्रक्रियेत एकूण ३३० महिला उमेदवारांना शारीरिक मोजमाप व चाचणीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यापैकी २२३ महिला उमेदवार उपस्थित राहिल्या, तर १०७ उमेदवार गैरहजर राहिल्या. उपस्थित उमेदवारांपैकी ३२ उमेदवार अपात्र ठरल्या असून उर्वरित १९१ उमेदवार शारीरिक मैदानी चाचणीस (८०० मीटर धावणे व गोळाफेक) पात्र ठरल्या आहेत.

शारीरिक मैदानी चाचणीनंतर उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी लातूर पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर ु.श्रर्ींिश्रिळलश.सीें.ळप प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर व पोलीस मुख्यालय, बाभळगाव येथेही यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या गुणांबाबत काही आक्षेप असल्यास उमेदवारांनी ४८ तासांच्या आत ी.श्रर्ीीरहर्रेश्रिळलश.सीें.ळप या ई-मेलवर लेखी आक्षेप नोंदवावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मैदानी चाचणीस पात्र उमेदवारांनी सकाळी ८ वाजता पोलीस मुख्यालय, बाभळगाव येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी ऑनलाईन भरलेला अर्ज व परीक्षा प्रवेशपत्र यांची छायांकित प्रत, तसेच ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र इ.) सोबत आणणे आवश्यक आहे.

भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांची शारीरिक क्षमता (धावणे व गोळाफेक) तपासली जाणार असून, प्रत्येक टप्प्यावर पात्र उमेदवारांची संख्या दर्शविण्यात येणार आहे. सर्व उमेदवारांनी वेळेत उपस्थित राहून आवश्यक तयारीनिशी सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले आहे.

# शिक्षण महर्षी 'स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त' आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन

बीड/प्रतिनिधी-शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत विविध केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा स्पर्धेचे आयोजन श्री. गणेश वाघ यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराज -फुले -शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या कार्याने प्रेरित झालेले व शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित केलेले बीड जिल्ह्यात नामांकित व्यक्तिमत्व असणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची आठवण जपत त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा प्राथमिक गट (इयत्ता ५ वी ते ७ वी) आणि माध्यमिक गट ( इयत्ता ८ वी ते १० वी) या दोन गटात घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना इतिहासाची ओळख आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळा विषयी अभिमान जागविण्याचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने प्राथमिक गटासाठी शिवनेरी किल्ला हा विषय देण्यात आला आहे. तर

माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांना व्यक्तीचित्र रेखाटनाद्वारे निरीक्षणशक्ती, बारकावे टिपण्याची क्षमता आणि सर्जनशीलता व्यक्त करण्याच्या उद्देशाने माध्यमिक गटासाठी व्यक्तीचित्र (पोर्ट्रेट) हा विषय देण्यात आला आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांना व्यक्तीचित्र रेखाटनाद्वारे निरीक्षणशक्ती, बारकावे टिपण्याची क्षमता आणि सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धे साठी बीड शहरातील यशवंत नगर भागातील यशवंत विद्यालय बीड आणि शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय ही स्पर्धा होणार आहे. या ठिकाणी प्रत्येक सहभागी शाळेने दोन्ही गटांमधून प्रत्येकी दोन-दोन विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठवावेत. या स्पर्धेसाठी लागणारा कागद आयोजकांकडून पुरविण्यात येईल. रंग, ब्रश, पेन्सिल व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे आवश्यक आहे. ही स्पर्धा पूर्णतः नि:शुल्क आहे. प्रवेशिका जमा करण्याची अंतिम तारीख १३ फेब्रुवारी २०२६ आहे. या दोन्ही गटांतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या शिवाय इतर क्रमांकांनाही उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे बक्षीस वितरण गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित स्पर्धा केंद्रांवर करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यास नक्कीच हातभार लावेल, असा विश्वास शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीडचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ यांनी व्यक्त करत या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळां आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे, असे आवाहन श्री गणेश वाघ सर यांनी केले.

# लातुरात कामगारांचा आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार विराट मोर्चा

लातूर: केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार,



बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करा, कामाच्या तासांत वाढ करू नका, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करा. सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/ कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करा. लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्यासाठी गुरुवारी १२ फेबुवारी सकाळी ११-३० वाजता लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा विराट मोर्चा धडकणार आहे. कामगार, कष्टकरी, श्रमिकांनी १२ फेब्रुवारीच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्यासह संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ आदींनी केले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.